ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 8 | APRIL - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# ISIS च्या सोशल मीडियातील प्रचार तंत्राला बळी पडण्यापासून वाचण्याचा भारतीय (मराठी) मुस्लीम समुदायाचा प्रयत्न



अहमद महंमद शेख
सहायक निर्माता, एबीपी माझा

**सारांश**

आज आपण महाराष्ट्रतील मराठी मुस्लीम समुदायामध्ये आतंकवादी संघटना, त्यांची आश्रयस्थाने आणि अशा संघटनांबद्दल असलेली सहानुभूती या बद्दल माध्यमे आणि काही उच्च बौद्धिक पातळीच्या महानुभवांमध्ये संभ्रम अवस्था निर्माण झालेली आहे तशीच सरकारमध्येही या समुदायाबद्दल अशी अवस्था निर्माण झाल्याचे आपणास दिसते आहे आणि अशी संभ्रमावस्था असणे देखील साहजिकच आहे कारण मध्यंतरी अनेक मुस्लीम तरुण अशा घातपाती कारवायांमध्ये असल्याचे दिसून आले होते.परंतु सामान्य मराठी मुस्लिमांचा या घटनांशी किती संबंध आहे किंवा ते या गोष्टींकडे कशा प्रकारे बघतात हे पाहणे.तसेच या विषयाची निवड करण्याचा हेतू म्हणजे ISIS सारख्या संघटनेच्या सोशल मीडियातील प्रचारतंत्राला बळी पडण्यापासून मुस्लीम समुदाय स्वतःला कशाप्रकारे वाचण्याचा प्रयत्न करतो यावर या संशोधनात प्रकाश टाकण्यात आला आहे प्रपोगंडा थेअरी अंतर्गत हे संशोधन पूर्णकरण्यात आले. लोकमतावर प्रभाव पाडण्यासाठी या थेअरी चा उपयोग केला जातो. वाल्टर लिपमण, हेरॉल्ड लास्वेल , जाक्स एलुल आणि एडवर्स बर्निन यांनी१९०० च्या सुरुवातीला प्रचाराच्या स्वरूपाबाबत सिद्धांत मांडले

**कीवर्डस-** ISIS, सोशल मीडिया, प्रचार तंत्र, मराठी मुस्लिम.

## प्रस्तावना-

ISIS च्या सोशल मीडियातील प्रचार तंत्राला बळी पडण्यापासून वाचण्याचा भारतीय(मराठी) मुस्लीम समुदायाचा प्रयत्न या विषयावरील संशोधन केल्यानंतर आलेले सर्व परिणाम या लघुप्रबंधामध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत. तसेच या प्रकरणात आपण प्रस्तावना म्हणून सुरुवातीलाISIS नावाच्या दहशतवाती संघटनेची माहिती दिली आहे तसेच त्यांची सोशल मीडियामध्ये काम करण्याची पद्धतही थोडक्यात मांडण्यात आली आहे. तसेच या संशोधनामध्ये सोशल मीडिया हा शब्द समाजमाध्यमांऐवजी वापरण्यात आला आहे आपल्या विशिष्ट वर्चस्वासाठी जनसमुदायांमध्ये भीती निर्माण करणे, धमकावणे, सामुहिक रित्या जाहीरपणे हत्या करणे इत्यादी कृत्ये किंवा अशी कृत्ये ज्यामुळे मानवाच्या दररोज च्या जीवनात बाधा पोहोचेल त्यांना जगण्यात अडचणी निर्माण होतील किंवा नेहमी जीव मुठीत धरून जगणे किंवा थोडक्यात मानवाच्या मनात प्रचंड भीती निर्माण करणे म्हणजे दहशतवाद होय. आज दहशत पसरविण्यासाठी किंवा अशा दहशती माजविण्यासाठी वेगवेगळ्या दहशतवादी संघटना सोशल मिडियाचा उपयोग करीत आहेत

आज जगभरात ISIS नावाच्या जागतिक आतंकवादी संघटनेने आपल्या विस्तारवादी धोरणांना अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी धर्माच्या नावाखाली हजारो कत्तली आणि हजारो निष्पाप नागरिकांना अतिशय क्रूरपणे मारण्याचे काम हि संघटन करत आहे तसेच आपल्या कट्टरपंथी विचारांनी जगभरातील मुस्लीम समुदायातील युवकांना आपल्याकडे आकर्षित करण्याचे काम जोरात सुरू आहे. आणि त्यांच्या या जाळ्यात जगभरातील अनेक मुस्लीम युवक अडकलेलेहि आहेत भारतामधीलहि काही उदाहरणे त्याच्यामध्ये आहेत,

काही मुठभर युवकांमुळे देशोदेशीच्या मुस्लीम समुदायांवरती त्यांच्या देशाविषयीच्या आस्थेवरच आज प्रश्नचिन्ह निर्माण होताना दिसत आहे त्यामध्ये भारत हादेखील अपवाद उरत नाही आणि इथला मुस्लीम समुदाय कशाप्रकारे या संकटातून किंवा ISIS जाळ्यात अडकण्यापासून, ISIS च्या समाजमाध्यमावरील प्रचार तंत्रात समुदायातील तरुण आणि सहकारी यांना कशाप्रकारे वाचविण्याचा प्रयत्न करतो याचा आढावा घेण्याचा प्रयत्न या प्रबंधाच्या आधारे केला आहे.

## साहित्य अवलोकन-

### १. अल कायदाचे मिडिया तंत्र – फिलीप सीब
### दक्षिण कॅलीफोर्निया विद्यापीठ -२००८-

अल कायदाची मिडिया यंत्रे ४००० वेबसाईट च्या माध्यमातून आपल्या अनुयायांना प्रोत्साहन व शत्रूंना धमकावण्याचे कार्य करीत असतो . अल कायदाची अल सहाब या निर्माता समूहाने २००५ मध्ये १६ चित्रफिती ,२००६ मध्ये ५८ तर २००७ मध्ये ९० हून अधिक चित्रफिती बनवल्या होत्या. २००६ मध्ये अल कायदाची वितरण शाखा 'ग्लोबल इस्लामिक मिडिया फ्रंट' ने 'जिहाद अकादमी' द्वारे अमेरिकी सैन्यावरच्या हल्याच्या ध्वनीचित्रफिती , IED प्रशिक्षण,होतकरू आत्मघाती बॉम्ब त्यांचे अखेरचे मृत्युपत्र वाचतानाच्या ध्वनीचित्रफिती, अमेरिका, इस्रायल व अन्य शत्रू देशांविरोधात युद्धासाठी आवाहन करणाऱ्या ध्वनीचित्रफिती प्रसारित केल्याअन्सार अल सुन्नाह या वितरण शाखेच्या द्वारे अल कायदा ने 'TOP -20' या नावाने अमेरिकी सैन्यावर झालेल्या हल्ल्यांचे चित्रीकरण करून ते प्रसारित केले.

### २. सोशिअल मिडिया आणि ISIS चा प्रभाव - डॅनियल कनिंघम

((डिफेन्स अनालिसिस नेव्हल पोस्ट ग्रेज्यूएट स्कूल, मोन्टेरी – मार्च २०१५
http://my.nps.edu/documents/104382430/104582412/Social+Media+and+the+ISIS+Narrative+(Everton+et+al).pdf/f1a2082d-993e-460b-9b7e-7808dc6219c9))

ISIS ने इराक आणि सिरीया मध्ये अधिक गतिमानतेने वाढ करून साऱ्या जगाचे लक्ष आपल्याकडे वेधले आहे. त्यांच्या कार्यपद्धतीतील क्रूरता आणि धार्मिक अल्पसंख्यांकांना दिली जाणारी क्रूर वागणूक (याझादि आणि ख्रिश्चन) यामुळे ते कुप्रसिध्द झालेले आहेत.

विविध चित्रफितीत आणि सोशिअल मिडियावरील पोस्ट च्या माध्यमातून इंटरनेटच्या जगातील आपली उस्थिती दाखवून आपणही सध्याच्या युगातील या तंत्राचे जाणकार आहोत हे हि त्यांनी सिध्द केले आहे. या क्रूर कार्यामध्ये एखाद्या व्यक्तीचा गळा चिरणे असेल किंवा एखाद्याला क्रूरतेने वागवणे असेल अशा प्रकारच्या चित्रफिती ISIS सर्रास आपल्या माध्यमातून पसरवत आहे तसेच ISIS हि संघटना सामाजिक कार्यामध्ये कशाप्रकारे सहभागी आहे हे हि आभासी प्रतिमा रंगविण्यासाठी सोसिअल मिडिया च्या माध्यमातून दाखविल्या जातात.हि संघटना आतंकवादी असल्यामुळे ट्वीटर व फेसबुक या संकेतस्थळांनी वेळोवेळी त्यांच्या अकाउंटसवर बंदी घातली तरी देखील नवीन नावाने पुन्हा सोशिअल मिडीयावर सक्रीय होण्याची त्यांची रचना गतिमान आहे.सोशिअल मिडीयाचा वापर करून या आतंकवादी संघटनेने आपल्यापासून दूर असलेल्या आपल्या दुश्मनांचा खात्मा करण्यासाठी प्रयत्न केला याचा माध्यमातून US, भारत, काही भ्रष्टाचारी मुस्लीम राष्ट्रे येथे ISIS चा दहशतवाद माजविण्याचा प्रयत्न चालू आहे.

### ३. सायबर जिहाद –ॲडाम हॉफमन अँड योरम स्वित्झर दि इन्स्टिट्यूट फोर नेशनल सिक्युरि स्टडीज इस्रायल – २०१५ http://www.inss.org.il/

सायबर जिहाद चा अर्थ आहे कि २१ व्या युगामध्ये तांत्रिक साधने व इंटरनेट चा वापर करून हिंसात्मक जिहाद इस्लामला वाढविण्याच्या ध्येयाने ISIS च्या समर्थकांकडून इस्लाम ला न मानणाऱ्या लोकांच्या विरोधात हिंसात्मक कारवाया करणे होय

सद्याच्या स्थितीमध्ये सायबर जिहाद हि संकल्पना सोशिअल मिडिया च्या मंचावर विराजमान आहे ज्यामध्ये फेसबुक , ट्वीटर सारखी साधने वापरली जातात. ISIS सारख्या आतंकवादी संघटना वेगवेगळ्या पत्रिका तसेच लिखित साहित्य सोबतच विविध प्रकारच्या चित्रफिती ज्या चित्रफिती व साहित्य तरुण युवकांना केवळ एक बाजू जी कि खोटी असते अशी बाजू दाखवून आपल्याकडे आकर्षित केले जाते तसेच आपल्या चळवळी मध्ये सामील करून घेतले जाते.

**४. नवीन आतंकवाद आणि नवीन माध्यमे –गाब्रीअल वेमन हैफा विद्यापीठ –इस्रायल २०१४ :**

https://www.wilsoncenter.org/sites

मार्च १, २००१ च्या संध्याकाळी अरिद ऊका हा जर्मन मध्ये वास्तव्याला असणारा अल्बनियान मुस्लिम youtube वर video पाहत होताyoutube चा वापर करत असतना त्याने एक video पहिला त्या video मध्ये एका us जवानाने एका मुस्लिम महिलेचा बलत्कार केला होता हे .video पाहिल्यानंतर आरीद ऊका क्रोधीत व आक्रमक झाला आणि एका बस द्वारे तो विमानतळाकडे निघाला रस्त्यात त्याने २ US कर्मचार्यांचे खून केले आणि इतर २ जण बंदुकीतून निघालेल्या गोळी द्वारे जखमी झालेआरीद उक ला तत्काळ . चौकशी अंती असे निष्पन्न झाले कि त्याच्या या कृत्यास .पोलिसांनी अटक केलीinternet कारणीभूत आहे अल कायदा .Youtube, Twitter, facebook, Instagram आणि इतर अनेक सामाजिक प्रसार माध्यमाचा उपयोग करून आपला संदेश लोकांपर्यंत पोहचवण्याचे कार्य करीत आहे.

**संशोधन समस्या-**

सध्या संपूर्ण जगाला ज्या आतंकी संकटाने घाबरवून सोडले आहेअसे संकट म्हणजे ISIS होय. आणि या संकटात भारतही थोड्याबहुत प्रमाणात अडकल्याचे दिसते. त्यातूनही ISIS च्या प्रचारतंत्राची महाराष्ट्राला आणि महाराष्ट्रातील मुस्लीम समुदायाला याची झळ बसताना दिसते.

ISIS च्या प्रचार तंत्रापासून महाराष्ट्रीय मुस्लीम कशाप्रकारे वाचण्याचा प्रयत्न करतो, हे करत असताना त्यांना नेमक्या कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते. एकूणच काही मुस्लीम तरुणांच्या ISIS च्या आकर्षणामुळे आज अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड देणारा मुस्लीम समुदाय कशाप्रकारेISIS च्या प्रचारतंत्रापासून वाचण्याचा प्रयत्न करतो हि संशोधन समस्या घेऊन, संशोधन करण्यात आले.

१. मराठी मुस्लीम समुदायाचेISIS बद्दल असलेले मत जाणून घेणे
२. मराठी मुस्लीम ISIS च्या प्रचारतंत्राविषयी काय विचार करतो हे तपासणे
३. महाराष्ट्रातील मुस्लीम ISIS च्या धोरणांचे समर्थन करतो कि विरोध करतो हे तपासणे
४. मराठी मुस्लीम युवकांमध्येISIS बद्दल असलेले आकर्षण तपासणे.
५ . कोणत्या कारणामुळे ISIS कडे मुस्लीम युवक आकर्षिला जातो
६ . ISIS च्या प्रचारतंत्राचा कशाप्रकारे मराठी मुस्लीम समुदायावर परिणाम होतो हे तपासणे

**गृहीतके-**

सदर संशोधनासाठी खालीप्रमाणे गृहीतकृत्ये मांडण्यात आली:

१. महाराष्ट्रीयन मुस्लिमांनाISIS बद्दल माहिती आहे.
२. महाराष्ट्रीयन मुस्लिमांनाISIS कडून संपर्क करण्याचा प्रयत्न केला जातो.
३. मराठी मुस्लिमांना त्यांच्या आजूबाजूच्या परिसरातISIS च्या प्रचारतंत्रामुळे निर्माण झालेल्या वातावरणाचा अनुभव येतो.
४. काही मराठी मुस्लिमांनाISIS बद्दल सहानुभूती वाटते
५. काही मराठी मुस्लीम ISIS प्रचार तंत्राशी व त्यांच्या भूमिकेशी सहमत असतात
६. ISIS हे संघटन इस्लामच्या तत्त्वांनुसार अनुरूप आहे कि विरुध्द आहे याबद्दलचा संभ्रम मराठी मुस्लीम समुदायामध्ये दिसतो
७. बऱ्याच मराठी मुस्लिमांनाISIS च्या सोशिअल मिडीयाच्या वापराबद्दल माहिती असते.
८. ISIS च्या प्रचारतंत्राला बळी पडून काही ठीकांनाहून मुस्लीम युवकISIS मध्ये सामील होण्याची इच्छा व्यक्त करतात.
९. काही मुस्लिमांवरISIS च्या सोशल मिडियातील प्रचार तंत्राचा प्रभाव पडतो.
१०. आणि बहुतांश मराठी मुस्लीम समुदायISIS च्या विरोधात लढण्यास तयार आहे

**संशोधन पध्दती-**

**अ. मुलाखत**

**ब. सर्वेक्षण**

ISIS या संघटनेच्या सोशल मिडियातील प्रचारतंत्रापासून वाचण्याच्या मुस्लिम समुदायाच्या प्रयत्नाला उद्धृत करण्यासाठी सदर लाघुप्रबंधामध्ये मुलाखत व सर्वेक्षण या दोन संशोधन तंत्रांचा वापर केला गेला

**तथ्य विश्लेषण : मुलाखत**

मुलाखतीमध्ये आपण तीन मान्यवरांची मुलाखत घेतली त्यामध्ये१. इरफान अली पीरजादे –मुस्लीम राष्ट्रीय मंच २. शकील भाई हिंदुस्थानी भायखळा दर्गा ट्रस्टी ३. शेख मेहताब अन्वर शेख – इस्लमिक स्कॉलर ,सोलापूर इत्यादी होय.

सर्वच मुलाखतीच्या वेळेस अगदी दिलखुलासपणे उत्तरे दिली सर्वच प्रश्नांवर जवळपास सर्वांचे एक मत आले परंतु त्यावरील उपाय योजना ह्या प्रत्येकाने आपापल्या अनुभवाप्रमाणे तसेच आपापल्या क्षेत्राप्रमाणे सुचविल्यावरील मुलाखतींवरून असे स्पष्ट होते कि भारतीय मराठी मुस्लीम समुदाय हाISIS च्या समाजमाध्यमावरील प्रचार तंत्राला बळी पडतो आहे परंतु त्याचा टक्का हा नगण्य असल्याचा समजतो तरीही सर्वांचे म्हणणे हेच आले कि हि दुर्लक्षित करण्याजोगी बाब नव्हे त्यासाठी योग्य त्या समुपदेशन पद्धतींचा अवलंब करण्यात यावा तसेच भारताने याविषयात अंतरराष्ट्रीय स्तरावर भूमिका घेणे गरजेचे असून जे काम आत्ता भारत सरकार करत आहे ते हि समाधानकारक असल्याचे समजते.

तसेच इस्लामच्या उपदेशांचा तसेच तत्वांचा गैरवापर न करत योग्य तो अर्थ लावून मुस्लीम समुदायातील तरुणांनी पुढे येण्याची गरजही व्यक्त झाली .

भारतीय मराठी मुस्लीम तरुणांनी ISIS च्या समाजमाध्यमांवरील प्रचार तंत्राला बळी पडू नये यासाठी त्यांच्या पालकांनी हि जबाबदारी स्वीकारली पाहिजे अशा प्रकारची मते हि या मान्यवरांकडून आली एकूणच या मुलाखतींमधून–

अ . इथला मुस्लीम देशद्रोही नसल्याचे परंतु

ब . पैशांचे आमिष व बेरोजगारी मुळेISIS च्या समाजमाध्यमांवरील प्रचार तंत्राला बळी पडण्याची शक्यता

क . तरीही इथला मुस्लीम त्याच्यापासून वाचण्याचा करीत असलेला प्रयत्न

ड . पालकांमध्ये असलेली साक्षरतेची आवश्यकता.

इ .समुपदेशनाची असलेली आवश्यकता तसेच

ई . भारताच्या सायबर सेलच्या सक्रियतेची आवश्यकता इत्यादी बाबी स्पष्ट झाल्या .

**तथ्य विश्लेषण : सर्वेक्षण**

या लघुप्रबंधामध्ये अधिक सुस्पष्टता यावी तसेच निष्कर्षापर्यंत योग्य त्या पद्धतीने पोहोचता यावे म्हणून पुढील प्रकारे ऑनलाईन सर्वेक्षण करण्यात आले . यामध्ये विविध प्रकारचे ISIS च्या प्रचार तंत्राशी संबंधित(विषयाशी संबंधित) प्रश्न विचारण्यात आले. साधारणतः हो किंवा नाही अशा प्रकारच्या अपेक्षित उत्तरांचे १० प्रश्न आणि १ प्रश्न असा कि ज्यामध्ये व्यक्तींना विस्तारित स्वरुपात उत्तर द्यायचे होते. जवळ जवळ मुस्लीम समुदायामधील ६२ व्यक्तींनी हा फॉर्म भरला त्यामध्ये १८ पेक्षा जास्त वय असलेले सर्वच वयोगटातील व्यक्तींनी आपली मते नोंदविली.

ज्यामध्ये महिला, विद्यार्थिनी, विद्यार्थी विविध क्षेत्रात काम करणारे तरूण युवक तसेच अनुभवी व्यक्तींनी सहभाग नोंदवला हा सर्वे प्रामुख्याने महाराष्ट्रापुरता मर्यादित असल्याने महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे, कल्याण, पुणे, सोलापूर, उस्मानाबाद तसेच औरंगाबाद इत्यादी जिल्ह्यातील कमी अधिक मुस्लीम व्यक्तींचे सर्वेक्षण झाले. या सर्वेक्षणाचा कालावधी हा ३ महिन्यांचा होता.

**सर्वेक्षणाचा उद्देश :**

गृहीत कृत्यांची उत्तरे मिळविणे हा सर्वेक्षणाचा उद्देश होय. गृहीतकृत्यांची उत्तरे मिळाल्यास संशोधनास निश्चित ध्येयापर्यंत पोहोचण्यास अडचणी येत नाहीत. त्यामुळे सर्वेक्षणाचा मार्ग हा त्यापैकी एक मानला जातो आणि सर्वेक्षणाचा उद्देशच प्रामुख्याने प्रश्नांची उकल करणे हा असतो.

त्यामुळे या सर्वेक्षणाचा मूळ उद्देश हा आहे कि मांडलेल्या गृहीतकृत्यांची उत्तरे मिळवीत

**ठळक विश्लेषण :**

ISIS च्या प्रचारतंत्राला बळी पडण्यापासून वाचण्याचा भारतीय(मराठी ) मुस्लिम समुदायाचा प्रयत्न याविषयातील संशोधनात मुलाखत आणि सर्वेक्षण या द्वारे मुस्लीम समुदायातील व्यक्तींची मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला

१. सर्वच मुस्लीम व्यक्तींनी ISIS च्या विरोधात लिहिण्याचा पयत्न केला

२. ISIS मुळे इस्लाम बदनाम होतो आहे अशा प्रकारची मते व्यक्त झाली

३. ISIS सहानुभूती नसल्याचे व त्याच्या प्रचार तंत्राचा थोडा बहुत का होईना पण परिणाम होत असल्याचे काहींनी मत व्यक्त केले

४. जो प्रभाव ISIS च्या प्रचार तंत्राचा होतो आहे तो असा कि ISIS च्या प्रचारामुळे इथल्या महाराष्ट्रीयन मुस्लीम समाजामध्ये ज्यांना ISIS शी घृणा आहे अशा व्यक्तींना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. लोकांचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला असून त्यांना स्वतःच्याच नजरेत अपराधी असल्याची भावना निर्माण होत आहे

५. ISIS च्या प्रचार तंत्रामुळे काही बेरोजगार तरुण पैशांच्या आमिषापोटी देश सोडून ISIS शी लढण्यास तयार आहेत .

६. ISIS इस्लाम च्या तत्वानुसार चालत नसून त्याला इस्लामिक संघटन आहे असे म्हणवून घेण्याचा अधिकार नाही

७. एकूणच सर्वच मुस्लीम समुदायांचा ISIS ला विरोध आहे.

८. **तथ्य संकलन : सर्वेक्षण**

| अ.क्र | प्रश्न | टक्केवारी | |
|---|---|---|---|
| | | उत्तर होय | उत्तर नाही |
| १ | आपल्याला ISIS च्या विषयात माहिती आहे काय ? | ८७% | १३% |
| २ | आपल्याला ISIS कडून कधी संपर्क करण्याचा प्रयत्न होतो का? | १% | ९९ % |
| ३ | आपल्याला आपल्या आसपास च्या वातावरणात ISIS चा प्रभाव जाणवतो का ? | ४ % | ९६% |
| ४ | ISIS च्या विषयी आपल्याला सहानुभूती वाटते का? | १ % | ९९ % |
| ५ | आपण ISIS च्या भूमिकेशी सहमत आहात का ? | ३ % | ९७ % |
| ६ | ISIS चे कार्य इस्लाम नुसार बरोबर आहे का ? | ३ % | ९७ % |
| ७ | ISIS च्या सोशिअल मिडिया च्या वापराबाबत आपल्याला माहिती आहे का ? | ३५ % | ६५ % |
| ८ | आपल्या आजूबाजूच्या परिसरातील मुस्लीम युवक ISIS मध्ये जाऊ इच्छितात काय ? | ३ % | ९७ % |
| ९ | आपल्या परीसारवर किंवा आपल्यावर ISIS च्या प्रचाराचा काही प्रभाव पडतो का ? | ६ % | ९४ % |
| १० | येणाऱ्या काळात ISIS च्या विरोधात लढण्याची संधी मिळाल्यास आपण लढाल का ? | ७९ % | २१ % |

**निष्कर्ष-ठळक निष्कर्ष :**

सदरील संशोधनातून काही ठळक निष्कर्ष आपण काढू शकतो

१. महाराष्ट्रातील मुस्लीम समुदायाला ISIS बद्दल सहानुभूती नाही किंवा ते ISIS ला आणि त्याच्या कारवायांना इस्लामनुसार मानत नाहीत.

२. महाराष्ट्रातील बऱ्यापैकी मुस्लीम समुदाय हा ISIS च्या प्रचारतंत्रापासून अनभिज्ञ आहे.

३. काही मुस्लीम युवक अज्ञान आणि पैशांच्या आमिषामुळे अशा प्रचारतंत्राने प्रभावित होतात

४. महाराष्ट्रातील मुस्लीम समुदायांमध्ये ISIS बद्दल सकारात्मक वातावरण नाही.

५. ISIS मुळे इस्लाम बदनाम होत असल्याची भावना मुस्लीम समुदायांमध्ये निर्माण झाली आहे

६. पालकांनी ISIS प्रभावापासून आपल्याला मुलांना वाचविण्यासाठी अधिक काळजी घेण्याची गरज निर्माण झाल्याचे दिसते

७. काही अपवाद वगळता संपूर्ण महाराष्ट्रीयन मुस्लीम समाज हा ISIS च्या विरोधात असल्याचे स्पष्ट होते.

वरील निष्कर्षांवरून आपणास हे लक्षात येते कि भारतीय मराठी मुस्लीम समुदाय कशाप्रकारे ISIS प्रचारतंत्रापासून स्वतःला वाचविण्याचा प्रयत्न करीत आहे.

### ५.४ संशोधनाची उपयुक्तता:

ISIS च्या प्रचार तंत्रापासून वाचण्यासाठी भारतीय मराठी मुस्लीमसमुदायाचे प्रयत्न या विषयाला घेऊन हे संशोधन केले या संशोधनाची उपयुक्तता हि खालील मुद्द्यांवरून आपल्याला स्पष्ट होईल

१ . भविष्यात मुस्लीम समुदायांमध्ये ISIS च्या किंवा अन्य आतंकवादी संघटनांच्या प्रभावाचा अभ्यास करता येईल

२ . भारतीय मराठी मुस्लीम समुदायांमध्ये ISIS बद्दल सहानुभूती असणाऱ्या युवकांची टक्केवारी काढता येईल किंवा हे प्रमाण कमी झाले किंवा जास्त हे शोधण्यास मदत होईल.

३ . या संशोधनामुळे ISIS च्या प्रचारतंत्राचा प्रभाव आणखी कमी करण्यास मदत होईल .

४ . या संशोधनातून समोर आलेल्या तथ्यांच्या व निष्कर्षांच्या आधारावर आपल्याला हे हि लक्षात येईल कि , बेरोजगारी आणि धर्मांधतेमुळे तसेच पैशांच्या आमिषामुळे ISIS च्या घातपाती कारवायाकडे वळणाऱ्या मराठी मुस्लीम तरुणांच्या साठी काय उपाय योजना करू शकतो.

५ . या संशोधनामुळे धार्मिक ठिकाणी जाऊन आपण ISIS च्या विरोधात प्रचार करू शकतो उदा. मस्जिद, दरगाह.
कारण धार्मिक ठिकाणे हि ISIS च्या कारवायांची आश्रयस्थाने तर नाहीतच पण धर्मगुरूंकडेही ISIS ला स्थान नाही, हे या संशोधनाच्या माध्यमातून स्पष्ट झालेले आहे.

६ . येणाऱ्या काळात ISIS च्या प्रचारतंत्राचा प्रभाव आणखी कमी करू शकतो

### संदर्भ-


१. इंडिया टुडे–मासिक

२. यु. के असेम्ब्ली निर्णय (अहवाल )- यु. के गृहमंत्रालय वेबसाईट https://www.gov.**uk**/government/organisations/**home-office**

३. अल कायदा मिडिया तंत्र –फिलीफ सीब www.au.af.mil/au/awc/awcgate/milreview/seib.

४. नवीन आतंकवाद आणि नवीन माध्यमे – गाब्रीअल वेमन https://www.wilsoncenter.org/sites

५. :सायबर जिहाद –अॅडाम हॉफमन अँड योरम स्वित्झर
http://www.inss.org.il/

६. सोशिअल मिडिया आणि ISIS चा प्रभाव-डॅनियल कनिंघम.
http://my.nps.edu/documents/104382430/104582412/Social+Media+and+the+ISIS+Narrative+(Everton+et+al).pdf/f1a2082d-993e-460b-9b7e-7808dc6219c9

७. The ISIS Twitter Census Defining and describing the population of ISIS supporters on Twitter By J.M. Berger and Jonathon Morga www.brookings.edu

८. ISIS Use of Social Media As a Force Multiplier In U.S. Attacks-http://www.tacda.org/

९. ISIS: Past, Present and Future?: ProISIS Media and State Formation Author: Dana Hadra- Boston College Electronic Thesis or Dissertation, 2015- https://dlib.bc.edu/islandora/object/bc-ir

१०. Homegrown Islamic Extremism in 2014: The Rise of ISIS & Sustained Online Recruitment - www.adl.org/

**११.** HOW SOCIAL MEDIA IS USED TO ENCOURAGE TRAVEL TO SYRIA AND IRAQ BRIEFING NOTE FOR SCHOOLS- HOME OFFECE UK.- **https**://www.tes.com/.../prevent-duty

**१२.** The Virtual 'Caliphate': Understanding Islamic State's Propaganda Strategy.- By Charlie Winter Foreword by Haras Rafiq www.quilliamfoundation.org

## संदर्भ ग्रंथसूची

१.जाती आणि जमाती -रामनाथ चव्हाण, पब्लिशिंग हाउस, पुणे

२. भारतीय समाज - प्रा. म. आवटे,प्रकाशक ग.वा करमरकर, महाराष्ट्र राजभाषा सभा

३.डॉ. बोधनकर सुधीर, प्रा. अलोणी , विवेक प्रकाशन, सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन, नागपूर

४. डॉ . आगलावे प्रदीप सामाजिक संशोधन पद्धती शास्त्रे व तंत्रे, साईनाथ प्रकाशन, नागपूर

५. डॉ. कऱ्हाडे बी.एम, शास्त्रीय संशोधन पद्धती,पिंपळपुरे प्रकाशन,नागपूर

६. प्रा. डॉ खैरणार दिलीप, प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी, डायमंड प्रकाशन पुणे

७. डॉ. बोरुडे रा. र ,संशोधन पद्धतीशास्त्र, र. पा. जोशी, प्रकाशन पुणे .

८. डॉ. वा. भा पाटील (२००६ ), संशोधन पद्धती, रंगराव पाटील

९. प्रा. नाग्धोंड, प्रा. गुरुनाथ द.,सामाजिक संशोधन पद्धती, कोल्हापूर

१० .इस्रायलची मोसाद -पंकज कालुवाला